## आदेश निशाणी क्र. ५८ वरील
## (सीएनआर क्रमांक एमएचबीयु–१३००० ५७७२०११)

०१. प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे विरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करुन त्यांना उलटतपास घेणेस परवानगी मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ सांगतात, वादी यांनी त्यांचा स्वतःचा पुरावा मुखत्यार यांचे मार्फत सादर केला असून साक्षीदार यांचाही पुरावा सादर केलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांचे विरुध्द कैफीयत नाही असाही आदेश झाला होता. तो आदेश रद्द करुन कैफीयत सादर केलेली आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांचे आधीचे विधिज्ञ प्रस्तुत प्रकरणाचे अनुषंगाने न्यायालयात हजर नसल्यामुळे दिनांक १९/०३/२०१३ व ०२/०५/२०१३ रोजी तसे उलटतपास नाहीचे आदेश पारित करण्यात आलेले आहेत. प्रस्तुतचे प्रकरण हे मौल्यवान अशा स्थावर मालमत्तेबाबत आहे. वादी व प्रतिवादी यांचेमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण व्हावे तसेच दाव्यामध्ये गुणवत्तेवर निर्णय व्हावा यासाठी या प्रतिवादींना उलटतपासाची संधी मिळणे गरजेचे आहे. दाव्यातील संबंधित काळात प्रतिवादी देशाबाहेर असल्यामुळे दाव्याच्या अनुषंगाने योग्य ती तजवीज करता आली नाही. या प्रतिवादींना संधी नाकारल्यास त्यांचे अतोनात नुकसान होईल. तरी झालेले आदेश रद्द होवून उलटतपास घेणेसाठी हा अर्ज.

०३. वादींनी प्रस्तूत अर्जास म्हणणे देवून सक्त विरोध दर्शविला. ते पुढे सांगतात, या प्रतिवादींनी या आधी निशाणी क्र. ४२ हा दिनांक ०३.०८.२०१३ रोजी कैफीयत नाहीचा आदेश रद्द करण्यासाठी केला होता व त्यानंतर चार वर्षानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये योग्य कारणाबाबतचा मजकुर नाही. वादी पुढे सांगतात, सदर निशाणी क्र.४२ हा अर्ज करतेवेळी या प्रतिवादींना उलटतपास नाही या आदेशाबाबत ज्ञात होते. परंतु त्यावेळी प्रतिवादींनी तसा अर्ज दिला नाही. शेवटी वादींनी प्रस्तुतचा अर्ज खर्च लावून नामंजुर करावा अशी मागणी केली.

०४. प्रतिवादी क्र.१ व वादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रस्तुतचा दावा जाहीरीकरण व कायमचा मनाई हुकूम मिळणेसाठीचा आहे, प्रस्तुत अर्जाव्दारे प्रतिवादी क्र.१ यांनी वादी यांचे मुखत्यार व साक्षीदार यांचा उलटतपास न घेतल्यामुळे झालेले उलटतपास नाहीचे आदेश रद्द करुन मिळण्याची मागणी केली आहे. प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, यातील वादी यांचे मुखत्यार यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.३१ वर दिनांक २५/१०/२०१२ रोजी दाखल झाले असून त्यांचा पुढील सरतपासही दिनांक १९/०३/२०१३ रोजी झाला आहे. त्यावेळी उलटतपास न घेतल्याने तसा उलटतपास नाहीचा आदेश पारित करण्यात आलेला आहे. तसेच वादी यांचे साक्षीदार यांचे पुराव्याचे शपथपत्र दिनांक ०६/०४/२०१३ रोजी दाखल केले होते. त्याची पडताळणी दिनांक ०२/०५/२०१३ रोजी झाली आहे व त्यानंतर उलटतपास न घेतल्यामुळे तसा उलटतपास नाहीचा आदेश पारित झालेला आहे. त्यानंतर प्रस्तुत प्रतिवादींनी दिनांक ०१/०७/२०१६ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०६. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी यांनी त्यांचे आधीचे विधिज्ञ प्रकरणाचे अनुषंगाने हजर नव्हते त्यामुळे उलटतपास घेता आला नाही, तसेच स्वतः प्रतिवादी परदेशात असल्यामुळे दाव्याचे अनुषंगाने योग्य ती तजवीज करता आली नाही असे नमुद केले आहे. परंतु नमुद कारणाचे अनुषंगाने या प्रतिवादींनी कोणतेही कागदपत्र दाखल केल्याचे दिसून येत नाही. परंतु प्रतिवादींनी कोणतेही कागद दाखल केले नाही या कारणावरुन या प्रतिवादींना उलटतपासासाठी संधी नाकारणे उचित होणार नाही. दाव्याचे स्वरुप विचारात घेता तशी उलटतपासाची संधी देणे उचीत वाटते, तशी संधी देण्याने दाव्याचा गुणवत्तेवर निर्णय होणेसाठी मदत होईल. परंतु तसे उलटतपास नाहीचे आदेश झाले ती तारीख व प्रस्तुत अर्जाची तारीख यातील कालावधी पाहता तसेच प्रस्तुत अर्जामुळे दाव्याचे काम लांबले आहे, व दावा आधीच्या स्थितीस जाणार आहे. याचा विचार करता थोडी जास्तीची खर्चाची रक्कम या प्रतिवादीवर लादणे उचीत ठरेल.

०७. सबब, वरील चर्चेचा विचार करता अंतिम न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. ०१ यांचा अर्ज निशाणी क्र.५८ हा रु. १,२००/–(रुपये एक हजार दोनशे मात्र) च्या खर्चावर मंजूर करुन दिनांक १९/०३/२०१३ व ०२/०५/२०१३ रोजी झालेले उलटतपास नाहीचे आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र.१ यांना वादींचे मुखत्यार व साक्षीदार यांचा उलटतपास घेण्याची परवानगी देत आहे. खर्चाची रक्कम वादी यांचे मुखत्यार– साक्षीदार व साक्षीदार यांना समप्रमाणात देण्यात यावी.

( कु.एल.एच.जाधव )
दिनांक : २९/०३/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
चिखली.